# मॉँटेसोरींची बालस्वातंत्र्याची संकल्पना

महाराष्ट्र बालशिक्षण परिषदेने ३१ ऑगस्ट हा दिवस 'बालस्वातंत्र्य दिन ' म्हणून साजरा करावा असे शिक्षणसंस्थांना व सामाजिक संस्थांना आवाहन केले आहे. मानसशास्त्राच्या आधारे आणि आपल्या शैक्षणिक प्रयोगांतून मूलभूत शैक्षणिक परिवर्तनाची वाट जगाला दाखविणाऱ्या मादाम मारिया मॉँटेसोरी यांची, ३१ ऑगस्ट ही जन्मतिथी. आणि त्यांनी दाखविलेल्या वाटेवरून आयुष्याची पन्नास वर्षे कृतिशील वाटचाल करणाऱ्या ताराबाई मोडक यांची ही पुण्यतिथी. या दोघींनीही बालशिक्षणाला देशाचे भवितव्य घडविणारे कार्य म्हणून महत्त्व दिले; आणि बालशिक्षणाचे पायाभूत तत्त्व म्हणून बालस्वातंत्र्याला, आपल्या शैक्षणिक विचारात महत्त्वाचे स्थान दिले.

देशाचे सामाजिक आणि सांस्कृतिक स्थैर्य, देशाचा राजकीय नि आर्थिक विकास आणि जागतिक पटलावरील देशाचे स्थान हे प्रामुख्याने अवलंबून असते, ते देशातील नागरिकांचे विचारस्वातंत्र्य किती टिकून आहे यावर. विचारस्वातंत्र्य हाच लोकशाहीचा आधार आहे; व्यक्तीची स्वतंत्रपणे विचार करण्याची क्षमता टिकून असेल तरच व्यक्ती लोकशाहीस आपला कृतिशील सहभाग देऊ शकते, याउलट, विशिष्ट विचारपठडीची गुलामी स्वीकारणारी व्यक्ती, आपल्या स्वतंत्र विचारशक्तीच्या वेळोवेळी येणाऱ्या उर्मींचे दमन करण्यातच आयुष्याचा फार मोठा उत्पादक भाग वाया घालवीत राहते.

मूल जन्माला येते तेच मुळी स्वतंत्र विचाराची जैविक नि मानसिक क्षमता घेऊन. स्वयंस्फूर्ती नि स्वयंशिक्षणाची प्रेरणा घेऊन. यासंदर्भातील बालकाची नैसर्गिकता टिकवून ठेवण्यासाठी बालकाला घरी नि दारी स्वातंत्र्याचे वातावरण जाणीवपूर्वक नि काळजीपूर्वक पुरवायचे असते. असे केले तरच, बालक जे काही घडण्याचे संचित घेऊन जन्माला आलेले असते ते घडण्याच्या दिशेने, बालकाचा विकास अबाधितपणे होऊ शकतो; बालकातून जन्माला येणारा प्रौढ स्वतंत्र विचाराची ताकद घेऊन आयुष्यात उभा राहतो.

मॉँटेसोरीबाईंनी, आपल्या वाङ्मयात बालकाच्या स्वातंत्र्याचा अनेक अंगांनी विचार मांडला आहे. 'स्वातंत्र्य' हे एक अत्यंत महान असे तत्त्व, त्या त्यांच्या शिक्षणपद्धतीला पायाभूत म्हणून मांडतात बालकाचे अवलोकन करण्यासाठी, त्याला विकृतीतून सोडवून समधारण स्थितीत आणणे, म्हणजे बालकाची विकृतीतून मुक्तता करणे हे त्यांच्या मूलभूत स्वातंत्र्य संकल्पनेचे एक परिमाण आहे. त्यांचे म्हणणे असे आहे की, बालकाचे अवलोकन करून त्याआधारे शिक्षणाच्या शास्त्रीय पद्धती ठरणार असतील तर बालकाचे त्याच्या 'मुक्त' अवस्थेतच अवलोकन करायला हवे. आणि ही 'मुक्तता हे बालकाचे एका प्रकारचे स्वातंत्र्य आहे. असे सर्व दडपणांपासून मुक्त असलेले बालक आपल्या अंतःप्रेरणेने वागत असते. आपल्या अंतर्यामी असणारी प्रेरणा ही नैसर्गिक प्रेरणा असते. ही मानवाच्या व्यक्तिगत विकासाची प्रेरणा असते. या प्रेरणेनेच मूल जन्मल्यापासून आपल्या विकासासाठी सदैव धडपडत असते. या धडपडीतून तेआपल्या स्नायूंना बळकटी आणते, आपल्या ज्ञानेंद्रियांना कार्यरत करते, आपल्या कर्मेंद्रियांना हालचालींतून शक्ती मिळवून देते, आपला शारीरिक विकास

पूर्णतेला नेते आणि आपल्या बौद्धिक -भावनिक क्षमतांची प्रगती साधते. अशाप्रकारे आपणच आपले शिक्षण करण्याची म्हणजे स्वयंशिक्षण करण्याचीच ही नैसर्गिक प्रेरणा असते.

'बालकाच्या स्वातंत्र्याची कल्पना मांडणे ही माँटेसोरीबाईंची जगाला फार मोठी देणगी आहे. बालक च्या स्वातंत्र्याच्या आवश्यकते बद्दल त्यांनी अनेक अंगांनी विचार केलेला आहे. तो बालकाच्या वर्गातील शिकण्याच्या संदर्भात जसा केला आहे तसाच तो सामूहिक जीवनाच्या संदर्भातही केला आहे. प्रत्येक बालक ही एक स्वतंत्र व्यक्ती आहे. निसर्गतःच तिचा जन्म, तिचा विकास व तिचा मृत्यु या स्वतंत्र अशा गोष्टी आहेत ; या अर्थाची छटाही माँटेसोरींच्या वाङ्घमयात येते. याचबरोबर, व्यक्तीला स्वतःच आपला विकास करवून घ्यायचा असेल तर तो स्वतःच्या कलाने, स्वतःच्या वेगाने करता आला पाहिजे. प्रत्येक व्यक्तीला आपल्या विकासासाठी स्वतंत्र वातावरणाची गरज असते. कोणीही, कोणत्याही दडपणाखाली, बंधनाखाली त्या व्यक्तीला ठेवता कामा नये. त्याला स्व - अधीनच राहू दिले पाहिजे.

ही भूमिका बालकाच्या बाबतीत, त्याच्या वर्गातील शिक्षणालाही तेवढीच लागू पडते. माँटेसोरींचे म्हणणे असे आहे की, बालकाला वर्गाचे शाळेचे वातावरण निर्भय वाटले पाहिजे. बहुधा शाळेतील शिक्षक हेच बालकाच्या भयाचे प्रमुख कारण असते. शिक्षकाची उग्र, करडी नजर, हातातील छडी, शाळेतील शिस्तीचा बडगा, धाक, शिक्षा आणि परीक्षासुद्धा शालेय वातावरण भयग्रस्त करून सोडतात, हा आपला अनुभव आहे. शिक्षककेंद्री शिक्षणातून आलेल्या या सर्व बाबी बालकाला कायम भयग्रस्त व दडपणाखाली ठेवत असतात. यातूनच बालकाचे स्वातंत्र्य हिरावले जाते, बालकाची स्वयंस्फूर्ती आक्रसते, बालकाच्या स्वावलंबी क्रियाशीलतेला सोडचिठ्ठी दिले जाते आणि मग बालकाची विकासाची निसर्गदत्त प्रेरणाच दूषित होते. असे सारे वातावरण हे एक प्रकारे बालकासाठी गुलामीचे वातावरण मारक असते. किंबहुना म्हणूनच, वर्गातील शिक्षक - शिक्षिका ही वेगळे वातावरण निर्माण करणारी, विश्वासाचे, प्रेमाचे, मुक्ततेचे वातावरण निर्माण करणारी असावी अशी अपेक्षा, माँटेसोरींनी सुचविलेल्या नवशिक्षणपद्धतीत केली जाते.

वर्गातील शिक्षकाच्या शिकविण्यातला एक वेगळा पण प्रभावी पर्याय माँटेसोरी पद्धतीत निर्माण झाला आहे. तो म्हणजे, बालकाला सर्वांगीण विकासाकडे देणाऱ्या वेगवेगळया शैक्षणिक साधनांचा पर्याय. माँटेसोरी पद्धतीचे खास वैशिष्टय म्हणजे ही साधने. यात जीवनव्यवहाराची साधने येतात तशीच, हस्तव्यवसाय, बागकाम, प्राणीसंगोपन, स्वाध्याय उपक्रम, सामाजिक शिक्षण असे भिन्न भिन्न मनोरंजक उपक्रमही येतात. या साधनांमुळे व उपक्रमांमुळे शिक्षण हे बालकाच्या 'स्वाधीन' राहते. व त्याकरवी बालकाची स्वातंत्र्याची वृत्ती जोपासली जाते; क्रमशः विकसित होत जाते.

माँटेसोरींच्या स्वातंत्र्य संकल्पनेचे एक वैशिष्टय असे की, ते केवळ व्यक्तिस्वातंत्र्यापुरते मर्यादित नाही. व्यक्तीला समाजातच जगायचे असते, वाढायचे असते, विकसित व्हायचे असते. त्यासाठी बालपणापासून तिला सामाजिक जीवनातील रीतीभाती कळणे, योग्य व्यक्तिगत व सामाजिक सवयी लागणे आवश्यक आहे. अशा सामूहिक जीवनाची सवय लहानपणापासूनच लागू शकते. त्यासाठी बालशाळेत सामूहिक उपयोगाची साधने व उपक्रम यांना स्थान दिले जाते. बालक स्वतंत्रतेने आपला विकास साधत असले तरी त्याचवेळी त्याला सामूहिक जीवनाचा स्वीकार हाही व्यक्तिस्वातंत्र्याचे एक परिमाण म्हणून येथे येतो. स्वातंत्र्याच्या मूल्याला येथे

सहकाराच्या मूल्याची जोड दिली जाते. संपन्न आयुष्याच्या निर्मितीसाठी स्वातंत्र्याच्या जोडीने सहकारही आवश्यक असतो.

अशाप्रकारे बालकाच्या विकासाच्या दृष्टिकोणातून आणि मानसशास्त्राच्या आधारे बालकाच्या स्वातंत्र्याचा विचार मॉंटेसोरींनी आपल्यापुढे ठेवला आहे. विकासक स्वातंत्र्याचा त्यांचा हा विचार केवळ तात्त्विक नाही तर तो अतिशय व्यावहारिक असा आहे. आपल्या घरांतून आणि शाळांतून बालकांसाठी स्वातंत्र्याचे वातावरण कसे निर्माण करता येईल, त्यातून बालकांच्या स्वयंस्फूर्तीला कशी चालना मिळेल हे आवर्जून पाहायला हवे. बालकाचे स्वातंत्र्य म्हणजे बालकाच्या स्वयंविकासासाठी उपलब्ध केलेले नि बालकाच्या स्वयंस्फूर्तीला पुरेसा वाव देणारे वातावरण होय. यासाठी बालशाळांनी बालकेंद्री शिक्षणाची कास धरायला हवी आणि कुटुंबांनी आपल्या घरातील वातावरण बालकेंद्री कसे करता येईल याचा शोध घ्यायला हवा.

❖